मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६२ ■ गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## खांदा कॉलनीत नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार खांदा कॉलनी प्रतिनिधी** : खांदा कॉलनीत नव्याने नुकतेच निवडून आलेले नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या कार्यालयाचे उद्घाटन माजी उपमहापौर सिताताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी भाजप नेते माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील भाजप जेष्ठ नेते गोपीनाथ मुंडे महिला अध्यक्षा आशा मुंडे रामनाथ पाटील शांताराम महाडिक यांच्या सह अनेक भाजप कार्यकर्ते उपस्थित होते



# दिव्यांगांचे कैवारी - तुकाराम मुंढे

**दैनिक युवक आधार संतोष आमले** : प्रशासनातील कठोर आणि पारदर्शक कामकाजासाठी ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग विभागाच्या सचिवपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर राज्यभरात ठोस निर्णयांची मालिका सुरू केली आहे. दिव्यांगांच्या हक्कांसाठी ठाम भूमिका घेत त्यांनी शासन यंत्रणेला सजग करण्याचे काम सुरू केले आहे.

**९०० शाळांवर कारवाईचा दणका**

राज्यात अनेक ठिकाणी विद्यार्थी नसतानाही केवळ शासकीय अनुदान घेण्यासाठी चालविल्या जाणाऱ्या सुमारे ९०० शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या हिताला तिलांजली देऊन अनुदानाचा गैरवापर करणाऱ्या संस्थांवर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेत शिस्त



आणि पारदर्शकता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**दिव्यांगांना न्यायाची अपेक्षा**

दिव्यांग विभागाच्या सचिवपदावर मुंढे आल्याने राज्यातील दिव्यांग बांधवांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे, योजनांचा लाभ खऱ्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि प्रशासकीय अडथळे दूर करणे यावर त्यांनी भर दिला आहे.

**खोट्या प्रमाणपत्रांवर कारवाई**

दिव्यांगत्वाचे खोटे प्रमाणपत्र मिळवून शासकीय नोकरी किंवा इतर सवलतींचा लाभ घेणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या सर्व निर्णयांमुळे दिव्यांग हक्कांच्या संरक्षणासाठी शासनाची भूमिका अधिक ठाम झाल्याचे दिसून येत आहे. प्रशासनातील शिस्तबद्ध आणि कडक कारभारामुळे तुकाराम मुंढे पुन्हा एकदा चर्चेत आले असून, दिव्यांग बांधवांसाठी ते खऱ्या अर्थाने "कैवारी" ठरत आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्तउलवेनोडमध्ये भव्य मिरवणूक व 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा' कार्यक्रम

**दैनिक युवक आधार पनवेल (प्रतिनिधी)** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उलवे नोड येथे भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती, गव्हाण यांच्या वतीने गुरुवार, दिनांक १९ फेब्रुवारी रोजी हा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.या उत्सवानिमित्त सकाळी ८.३० वाजता गव्हाण येथून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. वाद्यगजर, भगवे ध्वज



आणि शिवरायांच्या जयघोषात ही मिरवणूक मार्गक्रमण करणार आहे. सकाळी ९.३० वाजता उलवे नोडमधील खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील रामशेठ ठाकूर मैदान येथे मुख्य जयंती सोहळा पार पडणार आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, माल्यार्पण व अभिवादनाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत तसेच भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.जयंती सोहळ्यानिमित्त त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता रामशेठ ठाकूर मैदान येथे 'द फोक आख्यान' या कार्यक्रमांतर्गत सुप्रसिद्ध शाहीर चंद्रकांत माने आणि शाहिरा ऋतुजा माने यांचा 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा' हा विशेष शाहिरी कार्यक्रम सादर होणार आहे.

या कार्यक्रमातून शिवचरित्र, महाराष्ट्राचा इतिहास, पराक्रम आणि संस्कृती यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उत्सवासाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती तसेच गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावाखाडी, उलवे, वहाळ, मोरावे, बामणडोंगरी, जावळे व उलवेनोड येथील ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे. उत्सव समितीचे अध्यक्ष वसंत पाटील, उपाध्यक्ष अशोक कडू, जयवंत देशमुख, खजिनदार गजानन घरत यांनी शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जयंती सोहळा उत्साहात साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

## पारडगाव येथील आरोग्य उपकेंद्र बनले शोभेची वास्तू.....

**आयुष्यमान भारत योजनेतील लाखो रुपयांची इमारत धुळखात पडून**

**दैनिक युवक आधार रमेश सुरशे/छत्रपती संभाजीनगर** : घनसावंगी तालुक्यातील पारडगाव येथे शासनाच्या वतीने नागरिकास उत्तम सेवा मिळावी, व आरोग्य अबाधित राहावे, यासाठी बांधण्यात आलेली आयुष्यमान भारत योजनेतील बांधण्यात आलेली इमारत अखेर धुळखात पडून आहे. या इमारतीमध्ये ना डॉक्टर आहेत,ना आरोग्य कर्मचारी, सदरील इमारत मद्यपी व जुगारांचा अड्डा बनलेली आहे.शासनाने लाखो रुपये खर्च करून गावासाठी नवीन आरोग्य उपकेंद्र उभे केले खरे परंतु धुळखात पडून आहे. संबंधित कॉन्ट्रॅक्ट दाराने बिल उचलूनही लाईट फिटिंग, कंपाऊंड वॉल, व गेटचे काम केले नाही. असा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. तसेच संबंधित ठेकेदारावर प्रशासनाचा कुठलाही वचक नसल्यामुळे ग्रामस्थांना या इमारतीमध्ये आरोग्य सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. तरी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जातीय लक्ष देऊन सदरील आरोग्य उपकेंद्र त्वरित चालू करावे. व डॉक्टरांची आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थ विलास आढाव, प्रमोद माकोडे, सुनील ढेरे,अर्जुन ढेरे,परमेश्वर ढेरे, नामदेव भालेकर,आदींनी दिला आहे.




## प्रेम यशस्वी झाले नाही तर दुस-याचे आयुष्य उध्वस्त करु नका - साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : उरण फुंडे महाविद्यालय येथे कोकण मराठी साहित्य परिषद उरण आणि फुंडे महाविद्यालय मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात साहित्यरत्न प्रा. एल.बी.पाटील म्हणाले की प्रेम हा माणसाचा स्थायीभाव आहे.ते प्रेम आपण अवश्य करा पण दुर्दैवाने ते अयशस्वी झाल्यास आपल्या प्रिय व्यक्तीचे आयुष्य उध्वस्त करू नका,असा सल्ला विद्यार्थ्यांना " मी कालेजात असताना " ही विनोदी कविता सादर केली.



प्राचार्य अमोल ठक्कर यांनी आपल्याला योग्य व्यासपीठ मिळाल्यावर प्रयत्नानी यशस्वी करण्याचा प्रयत्न करा असे सांगून प्रेरणादायी कविता सादर केली.कॉलेजच्या आवारात झालेल्या या कविसंमेलनात निरागस प्रेम,देशप्रेम, मातृप्रेम आणि यौवनातील प्रेम यावर संस्कारक्षम कविता सादर केल्या गेल्या.प्रा गजानन चव्हाण यांनी प्रास्ताविक केले.डॉ.चितामणी धिंदले,प्रा. गोसावी आयोजन केले,प्रा सुप्रिया नवले यांनी सूत्रसंचालन केले.कविसंमेलनात अक्षता गोसावी,स्वाती गाडे, ऋतुजा म्हात्रे,महामुनी, रामचंद्र म्हात्रे गज आनन म्हात्रे, शिवप्रताप पंडित,दौलत पाटील,माही भोईर,तेजस्वी रेवसकर इत्यादींनी विद्यार्थ्यांना आनंद देणा-या कविता सादर करून रंगतदार कविसंमेलन संपन्न केले.

## निफाड तालुक्यात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी फिजिओथेरेपी शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : निफाड तालुकास्तरीय संसाधन कक्ष, जि.प. शाळा, ओझर (मुले क्र. २) येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय फिजिओथेरेपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. Nashik Zilla Parishad व Maratha Vidya Prasarak Samaj यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी Omkar Pawar यांच्या आदेशानुसार हे शिबिर पार पडले.

या शिबिराचा एकूण ११ दिव्यांग विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मेडिकल कॉलेजच्या डॉ. नंदिनी बाहेती, डॉ. भावेश शेवाळे, डॉ. प्रेरणा अग्रवाल व डॉ. वृषाली बोरा यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फिजिओथेरेपी उपचार दिले.

तसेच उपस्थित पालकांना घरी थेरपी कशी द्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून पालकांकडून सराव करून घेण्यात आल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला. विद्यार्थ्यांकडूनही उपचारांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला.या वेळी निफाडचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी व जिल्हा समन्वयक समाधान दाते यांचे मार्गदर्शन लाभले. विशेषतज्ञ मुकेश जगताप, विशेष शिक्षिका अर्चना राणे, पूजा खोतकर आदी मान्यवर उपस्थित होते.दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारची शिबिरे उपयुक्त ठरत असून भविष्यातही अशी उपक्रम राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवात 'इन्व्हेस्टर्स मीट'; गुंतवणूकदारांचा मोठा प्रतिसाद !!

## पर्यटन व्यवसायिकांनी पुढे यावे; संपूर्ण सहकार्य करू : जिल्हाधिकारी वर्षा मीना

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी अकोट(अकोला)** : नरनाळा किल्ला व परिसर येथे पर्यटन विकासाच्या अनेक शक्यता असून, गुंतवणूक वृद्धीसाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रयत्न होत आहेत. येथील ऐतिहासिक वारसा, समृद्ध निसर्ग यामुळे हे पर्यटन नकाशावरील महत्त्वाचे 'डेस्टिनेशन' ठरणार आहे. येथे व्यवसाय उभारण्यासाठी पर्यटन व्यावसायिकांनी पुढे यावे. शासन–प्रशासनातर्फ त्यांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले.



नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवात 'इन्व्हेस्टर्स मीट' मेळघाट टायगर रिट्रीट येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीतर्फे झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. माजी आमदार संजय गावंडे, उपवनसंरक्षक राहुलसिंह टोलिया यांच्यासह जिल्ह्यातून, तसेच जिल्ह्याबाहेरून व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, नरनाळा किल्ला, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, धरण व पर्यटकांसाठी आकर्षण ठरतील अशी अनेक महत्वाची स्थळे या परिसरात आहेत. येथे इको रिसॉर्ट, इको स्टे, निसर्ग आधारित उपक्रम, कृषी पर्यटन, बोटिंग असे अनेक व्यवसाय निर्माण होऊ शकतात. स्थानिकांसाठी पूरक व्यवसायांची व रोजगाराची संधीही निर्माण होणार आहे. येथील संस्कृती, ऐतिहासिक वैभव, वनसंपदा यांचे जतन करून व सर्व वन कायदे, नियमांचे पालन करूनच पर्यटन विकास होणार आहे.

येथे गुंतवणूक वाढून स्थानिकांना पूरक व्यवसाय व रोजगार मिळवून देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे.येथील गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरणार असून, स्थानिक विकास साधण्यास मदत होणार आहे. व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक परवानग्या आदींसाठी प्रशासनाकडून संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अनेक व्यावसायिकांनी गुंतवणुकीची तयारी दर्शवली. इच्छुक स्थानिक व्यावसायिक, बाहेरून आलेले गुंतवणूकदार यांच्यातही व्यावसायिक भागीदारी, व्यवसाय वाढीच्या शक्यता याबाबत चर्चा झाली. हा विषय पूर्णत्वास जाण्यासाठी दर महिन्याला बैठक घेऊन पाठपुरावा करण्यात येणार आहे.

या परिसरात प्रथमच अशी बैठक घेण्यात आली त्याबाबत सर्व गुंतवणूकदारांनी प्रशासनाचे आभार मानले.

# प्रभाग क्रं (ब) चा नगरसेवक प्रतिनिधी प्रभाकर पांचाळ यांचा दलित आणि हिंदू समाजावर दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी योगेश चौदंते :** प्रभाग क्रं 3 ब चे नगरसेवक प्रतिनिधी असलेले प्रभाकर पांचाळ असून देखील ते नवी आबादी मधील लाईट लावण्या साठी वारंवार सांगून सुद्धा मुद्दाम ते काम करत नाही आणि त्यांनि माणूस बघून काम करताना दिसत आहे आणि त्यांना ज्या कामात कमिशन भेटत आहे तेच काम करताना दिसत आहेत गरिबांना आणि हे दलित समाजाला त्रास होताना देखील त्यांनी लक्ष देत नाहीत कारण त्यांना इलेक्शन मध्ये ज्या लोकांनी सोबत राहून काम केलाय अश्या लोकांच्या कामा साठी नगरसेवक झाल्या सारखे वागत आहेत आणि आम्ही निवडून देऊन सुद्धा ते काम करत नाही ज्या प्रभागाचा नगरसेवक असून सुद्धा दुसऱ्या गल्लीत जाऊन काम करत आहे हलकी ते प्रभाग क्रं 3 (अ) चा नगरसेवक मुस्लिम समाजाचा आहे पण ते लक्ष देत नसल्या मुळे प्रभाग क्रं (ब) चा नगरसेवक प्रभाकर पांचाळ यांनीच तिकडे काम करताना दिसत आहेत आणि ज्या लोकांन मुळे निवडून आलेत म्हणजे च दलित मातंग आणि हिंदू समाजाला दूर करत आहेत यांचा हा मनमानी पना काय कामाचा आहे



दलित वस्तीला लाईट आलेले असून सुद्धा त्यांनी मुस्लिम च्या भागात लाईट लावताना दिसत आहेत आणि त्यांनी मंजूर करताना दलित समजला समोर करून मंजूर करून घेतले असून त्यांनी हिंदू समजला देखील अंधारात ठेवले आहे त्यांना देखील अंधाराचा सामना करावा लागत आहे

# विमला तलावाकाठी शिव शौर्याचा जागर ; मधुबन कट्ट्यावर रंगले १२४ सावे कवी संमेलन!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :**नवोदित कवींना हक्काचे व्यासपीठ आणि ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळ्याचे साधन उपलब्ध करून देणाऱ्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे 'मधुबन कट्टा' परिवाराचे १२४ सा वे मासिक कवी संमेलन मंगळवार दिनांक १७फेब्रु. रोजी उरण मधील विमला तलाव येथे मोठ्या उत्साहात पार पडले. १९ फेब्रुवारीच्या शिवजयंतीचे औचत्य साधून या संमेलनाचा विषय 'छत्रपती शिवाजी महाराज' हा ठेवण्यात आला होता.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते शिवव्याख्याते सह्याद्री रत्न श्री देवेंद्र ठाकूर यांचे शिवव्याख्यान ,ठाकूर यांनी आपल्या कणखर आवाजात आणि सखोल





अभ्यासातून शिवचरित्राचे विविध पैलू उलगडले. त्यांचे जोशपूर्ण मांडणीमुळे उपस्थित श्रोते ऐतिहासिक कालखंडात हरवून गेले होते. त्यांच्या व्याख्यानाने संपूर्ण परिसरात एक वेगळी स्फूर्ती आणि चैतन्य निर्माण केले.

या संमेलनाचे अध्यक्षपद रवींद्र सूर्यवंशी यांनी भुषवले. मधुबन कट्ट्याच्या परंपरेनुसार विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये ज्येष्ठ समालोचक जीवन केशव डाकी बोरखार आणि पनवेल चिंचवड येथील प्रसिद्ध शिल्पकार केतन खुठले यांचा समावेश होता. याप्रसंगी रायगड भूषण प्राध्यापक एल बी पाटील सर, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे ,मारुती तांबे, निमंत्रित कवी राजेंद्र नाईक, प्राध्यापक डॉ. साहेबराव ओहोळ ,मच्छिंद्रनाथ म्हात्रे, न. ग. पाटील, चंद्रकांत मुकादम, एस ए चव्हाण यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

निमंत्रित कवी राजेंद्र नाईक यांच्यासह उपस्थित अनेक कवींनी शिवरायांची वीरता चारित्र्य आणि शौर्यावर आधारित कविता सादर केल्या. प्रत्येक कवितेतून महाराजांच्या पराक्रमाचा इतिहास जिवंत झाला .ज्यामुळे संपूर्ण संमेलनात एक ऐतिहासिक वातावरण तयार झाले होते. मधुबन कट्टया तर्फे दर महिन्याच्या १७ तारखेला अशा स्वरूपाच्या संमेलनाचे आयोजन करण्यात येते. संस्थेच्या आगामी १२५ वे रोप्य महोत्सवी संमेलन उरण तालुक्यातील 'पाले 'येथे आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. या उपक्रमाला श्रोत्यांची वाढता प्रतिसाद मिळत असून कवितेचा हा जागर समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# द्राक्षमालाच्या व्यवहारात घाई नको; रोखीच्या व्यवहारावर भर द्या

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : चालू द्राक्ष हंगामात उत्पादन सरासरीपेक्षा निम्म्याहून कमी झाले असले तरी देशांतर्गत तसेच परदेशी बाजारपेठेत द्राक्षमालाला चांगली मागणी व समाधानकारक बाजारभाव मिळत आहेत. त्यामुळे हवामानातील किरकोळ बदलांमुळे घाबरून द्राक्षमालाच्या व्यवहारात घाई करू नये, असे आवाहन महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

संघाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उन्हाची तीव्रता वाढत असल्याने द्राक्षांना अपेक्षित गोडवा प्राप्त होत आहे. सध्याच्या परिस्थितीत द्राक्ष उत्पादकांनी व्यवहार करताना विशेष दक्षता घ्यावी. विशेषतः निर्यातदारांशी व्यवहार करताना शक्यतो रोखीने व कोणतीही कपात न स्वीकारता व्यवहार करण्याचा प्रयत्न करावा. तडजोडीची वेळ आल्यास पाच टक्क्यांपेक्षा अधिक कपात मान्य करू नये, असा ठाम सल्ला देण्यात आला आहे.

तसेच निर्यातदारांची पत, पूर्वीचे व्यवहार आणि आर्थिक विश्वासार्हता याची खातरजमा करूनच व्यवहार करावेत. देशांतर्गत बाजारपेठेतील व्यापाऱ्यांबाबतही अशीच दक्षता घ्यावी व रोखीच्या व्यवहारालाच प्राधान्य द्यावे, असेही संघाने स्पष्ट केले आहे.वातावरणात मोठे बदल होण्याची शक्यता नसल्याने अनावश्यक भीती न बाळगता सावधगिरीने व नियोजनपूर्वक व्यवहार करावेत, असे आवाहन संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले, नाशिक विभाग अध्यक्ष बाळासाहेब गडाख, मानद सचिव बबनराव भालेराव तसेच संचालक मंडळाने केले आहे.

# ग्रामरोजगार साहेबांची जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन

## नियुक्ती आणि बदली व मानधन प्रक्रियेत रोजगार संघटनेचा अन्यायाविरोधात आवाज

**दैनिक युवक आधार**

**चिखली तालुका ग्रामीण प्रतिनिधी/ रंगनाथ सावळे पाटील** : ग्राम रोजगार सहाय्यक यांच्या समस्येकडे प्रशासनाने लक्ष देऊन लवकरात लवकर समस्या सोडविण्यासाठी ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने ९ फेब्रुवारी रोजी बुलडाणा जिल्हाध्यक्ष श्रीमंत देशमुख यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

१) ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे.२) ग्रामस्तरावर मस्टर




काढण्यासाठी युझर आयडी, पासवर्ड मिळणे.३) ज्या ग्रामपंचायत मध्ये ग्रामरोजगार सहाय्यक नाही तेथे नवीन ग्राम रोजगार सहाय्यकाची नियुक्ती करणे.४) ग्रामरोजगार सहाय्यक यांच्या ऐवजी इतर कर्मचारी काम करत आहेत अशा कर्मचाऱ्यांऐवजी त्या पदावर ग्रामरोजगार सहाय्यकांची निवड करणे.५) जिल्ह्यातील बऱ्याच ग्रामपंचायत मध्ये ग्रामरोजगार सहाय्यकांना कामाचे मानधन दिल्या जात नाही. यासंदर्भात आपले स्तरावरून कार्यवाही करणे.६) स्थानिक APO आणि CDO तसेच PTO यांची बदली करून इतर तालुक्यातील APO आणि CDO व PTO यांची निवड करणे.७) राजकीय हेतूने विनाकारण पदावरून कमी केलेल्या ग्रामरोजगार सहाय्यकांना परत पदावर घेणे.८) जिल्ह्यातील ज्या ग्रा. प. मध्ये राजकीय हेतूने दुय्यम रोजगार निवडले आहे.त्यांची नियुक्ती रद्द करणे.यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले यावेळी जिल्हा सचिव पृथ्वीराज गवई,संघटक संजय मोरे सह पदाधिकारी ग्राम रोजगार सहाय्यक उपस्थित होते.

# ज्ञानदीप विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप; 'करिअर मंत्रा'सह हॉल तिकीट वाटप

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** शहरातील शिक्षक नगर भागातील ज्ञानदीप प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि हॉल तिकीट वाटपाचा सोहळा 'मिशन बोर्ड परीक्षा' या उर्जेने संपन्न झाला. "बोर्डाची परीक्षा ही भविष्यातील संधींचे द्वार असून विद्यार्थ्यांनी आत्म विश्वासाच्या बळावर यशाला गवसणी घालावी," असे प्रेरणादायी प्रतिपादन यशोदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष



मधुकररावजी गवळी यांनी यावेळी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मधुकररावजी गवळी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून लॉजिक कॉम्प्युटरचे संचालक तथा करिअर मार्गदर्शक जितेंद्रजी पाडवे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक बडक सर व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्राचार्या श्रीमती दिवेकर मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती . मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व सत्काराने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मार्गदर्शन करताना जितेंद्रजी पाडवे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचे दडपण न घेता वेळेचे नियोजन आणि स्मार्ट स्टडीचे तंत्र समजावून सांगितले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला, तेव्हा उपस्थित सर्वच भावूक झाले होते. याच सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना बोर्डाचे हॉल तिकीट वितरित करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्रावणी व श्रेया पडोळे यांनी केले, तर आभार वाढेकर सर यांनी मानले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये पाणीपुरवठा कमी दाबाने; नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांची तात्काळ पाहणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल येथील सेक्टर १७, पीएल-५ परिसरातील इंद्रायणी सोसायटी, अष्टविनायक सोसायटी तसेच ई-वनमधील वरदविनायक सोसायटीतील नागरिकांनी पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची तक्रार केली. तक्रार प्राप्त होताच नगरसेविका डॉ. अस्मिता जगदिश घरत यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली.

सदर भागात पनवेल महानगरपालिका मार्फत ड्रेनेज पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. या कामादरम्यान पाणीपुरवठ्याची पाइपलाइन तुटल्यामुळे संबंधित इमारतींमध्ये पाण्याचा प्रवाह कमी झाल्याचे निदर्शनास



आले.याबाबत डॉ. अस्मिता घरत यांनी महानगरपालिका पर्यवेक्षक तसेच संबंधित कंत्राटदारांशी चर्चा करून तातडीने दुरुस्तीचे आदेश दिले. काम योग्य पद्धतीने व त्वरीत पूर्ण करून नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत प्रशासनाशी समन्वय साधून त्वरित तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे डॉ. घरत यांनी यावेळी सांगितले. स्थानिक नागरिकांनीही त्वरित दखल घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# समाज कल्याणच्या समता चित्ररथ व डिजीटल एलईडी व्हॅनचा अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**गजानन पवार पाटील/ वाशिम(जिमाका):** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध महत्वपूर्ण योजनांची माहिती संबंधित घटकातील लाभार्थ्यांना व्हावी, यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने अनुसूचित जाती उपयोजना सन २०२५-२६ अंतर्गत तयार केलेल्या समता चित्ररथ व डिजीटल एलईडी व्हॅनचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील आणि निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी आज दि. (१८) रोजी प्रशासकीय इमारत परिसरात चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून केला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी श्वेता राऊत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत,सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, समाज




कल्याण कार्यालयाचे विशेष अधिकारी राहुल चोंडकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

समता चित्ररथ व डिजीटल एलईडी व्हॅनच्या माध्यमातून समाज कल्याण विभागाच्या महत्वपूर्ण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य, अनुसूचित जातीच्या मुलां-मुलींसाठी निवासी शाळा, मार्जिन मनी योजना, शेळी गट वाटप योजना व कन्यादान योजना या योजनांवर आधारित ऑडिओ-व्हिडीओ दाखविण्यात येणार आहे. तसेच जिल्हयातील बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचे वाटप, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना, रमाई आवास योजना, मुलां-मुलींसाठी वसतीगृह योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजना व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजना आदी योजनांवर आधारीत यशोगाथा या माहितीपटातून दाखविण्यात येणार आह समता चित्ररथ व डिजीटल एलईडी व्हॅन जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक गावात जाणार असल्यामुळे संबंधित घटकांच्या लाभार्थ्यांना समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील राजू जाधव, प्रमोद राठोड, अनिल कुरकुटे उपस्थित होते.

# समतोल फाउंडेशनचा महा होमहवन भक्तीभावाने संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** समतोल फाउंडेशन हे गेल्या बावीस वर्षापासून ८ ते १८ वयोगटातील हरवलेल्या अथवा स्वतःहून रागाने आपल्या आई-वडिलांना सोडून गेलेल्या मुलांना रेल्वे स्टेशन किंवा ज्या ठिकाणी कुठे भेटेल त्या ठिकाणाहून आपल्या ताब्यात घेऊन त्यांचा सांभाळ करते. अशा भेटलेल्या मुलांना फाउंडेशन च्या मनपरिवर्तन केंद्रात ठेऊन त्यांना शिक्षणाचे तसेच संस्काराचे धडे दिले जातात. अशा मुलांना संस्काराचे धडे देण्यामागे समतोल फाउंडेशनचा फार मोठा सिंहाचा वाटा आहे. कुठल्याही प्रकारचा सीएसआर फंड मिळत नसताना देखील माणुसकी असलेला किंवा सामाजिक कार्याची अंतर्मनातून आवड असणा-या सन्माननिय व्यक्तींच्या मिळणाऱ्या योगदानातून हे कार्य अगदी जोमाने सुरु आहे. या संस्थेचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष विजय जाधव यांची या कार्यात फार मोठी भुमिका आहे. अगदी वयाच्या १९ वर्षांपासून सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देणाऱ्या विजय जाधव यांनी समतोल फाउंडेशनच्या माध्यमातून मामणोली मुरबाड सारखे चार केंद्र उभारले आहेत. आणि या चार केंद्रांच्या माध्यमातून विजय जाधव यांनी आपल्या सहकाऱ्याना सोबत घेऊन आजपर्यंत एक लाख चोवीस हजार मुलांना त्यांच्या आई वडिलांच्या स्वाधीन केले आहे ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे.हे कार्य करत असताना अनेक अडचणींचा विजय जाधव यांना सामना करावा लागला. एव्हना सतरा केसेस त्यांनी आपल्या अंगावर झेलल्या, परंतु या कार्यातून ते कधीच मागे हटले नाहीत. या कार्याला त्यांनी उत्स्फूर्तपणे पुढे नेले. इतकेच नव्हें तर त्यांच्या या कार्याची दखल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली आणि त्या अनुषंगाने दोन वेळा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्याचा योग आला. देशात अशाप्रकारे कार्य करणारी समतोल फाउंडेशन हि एकमेव संस्था आहे असे विजय जाधव यांनी मत व्यक्त केले. यासोबतच संस्थेने एका बसमध्येच

फिरती शाळा सुरू केली आहे. सदर बस ग्रामीण भागातील वेठ बिगारी, आदिवासी व शेतक-यांच्या मुलांना त्यांच्या परिसरात जाऊन त्यांची बसमध्ये शाळा घेतली जाते.अशाप्रकारे शिक्षणाचे धडे देऊन समतोल फाउंडेशन मुलांची शैक्षणिक पातळी वाढविण्याचे मोठे कार्य देखील करत आहे. त्यामुळे जी मुले घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी कुठलीच सुविधा नसल्याकारणाने शिक्षणापासून वंचीत राहतात, अशा मुलांना शिक्षणाचे धडे मिळतात.

समतोल फाउंडेशनच्या गोशाळा देखील आहेत, तसेच अनेक उपक्रमांसोबत समतोल फाउंडेशन गेल्या वीस वर्षांपासून महाशिवरात्रीच्या होम हवनाचा पवित्र उपक्रम राबवत आहे. त्यामुळे आध्यात्मिक कार्यात देखील समतोल फाउंडेशन कुठेच मागे नाही. निराधार निराश्रित मुलांच्या सहवासातून स्वामी विवेकानंद मनपरिवर्तन केंद्रात शिवलिंग हाताने बनवून त्याच शिवलिंगाची पुजा मोठ्या भक्तिभावाने केली जाते. यावर्षी देखील असेच मन मोहून टाकणारे अतिशय सुरेख शिवलिंग बनविण्यात आले होते. महादेवाच्या आशिर्वादाने उत्साहपूर्ण वातावरणात महाशिवरात्रीच्या दिवशी हि पुजा अनेक मान्यवराच्या उपस्थितीत होत असते हे भाग्यच आहे, असे संस्थापक अध्यक्ष विजय जाधव यांनी आवर्जून सांगितले. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील महाशिवरात्री निमित्त एकूण पंचवीस कुंडाचा महाहोमहवन करण्यात आला, पाच पंडीताच्या मुखातून निघणाऱ्या मंत्रोच्चाराने हा परिसर ऊर्जामय होऊन गेला. निसर्गरम्य वातावरणात झालेल्या महाहोमहवनाची एक वेगळीच



प्रचिती शिवभक्तांना या ठिकाणी मिळाली.

किमान तीन तास चाललेल्या या होमहवनाने सऱ्या वातावरणात नव चैतन्य निर्माण झाल्याचा भास अनुभवायला मिळाल्याचे शिवभक्त म्हणाले. प्रत्येका च्या मुखातून हर हर महादेव निघणाऱ्या या शब्दाने संपूर्ण परिसरातील वातावरण शिवमय झाले होते. या सोहळ्याची अनुभूती घेण्यासाठी मानव हक्क व माहिती अधिकार जनजागृतीचे कार्य करणाऱ्या शिव स्वामी फाउंडेशन ट्रस्टचे तसेच मराठी वृत्तपत्र विचार विमर्शचे हिरादास सोनावले, विलास सावंत, नरेंद्र पाटील, डॉ. शिंगारे, ललिता गडकरी इत्यादी मान्यवरांनी उपस्थिती लावली. तसेच विक्रोळी, बदलापुर इत्यादी ठिकाणाहूनही महाशिवरात्रीच्या होमहवनास शिवभक्त हजर होते. उपस्थित मान्यवर व शिवभक्तांनी आपल्या प्रतिक्रिया मध्ये समतोल फाउंडेशनच्या कार्याचे व विजय जाधव यांचे कौतुक केले.

# सुरगाणा महाविद्यालयात स्वर्गीय रेणुका हिरे पुण्यतिथी साजरी

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वर्गीय रेणुका (आजी) भाऊसाहेब हिरे यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजन करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राहुरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोसावी उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी भाषणात सांगितले की , प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठी मागे त्याच्या स्त्रीचा हात असतो त्याप्रमाणे शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्यात रेणुका आजींचे फार मोठे योगदान राहिलेले आहे. त्यांनी आपले जीवन व कुटुंब सामाजिक व शैक्षणिक कार्यात वाहून घेतले होते.



कौटुंबिक संस्काराचा वारसा आजींनी पुढे चालविला व समाजासमोर एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा नावलौकिक होता असे सांगितले.

कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. कविता भोये यांनी केले. तर आभार प्रदर्शन शैक्षणिक सुपरवायझर प्रा. सुरेश भोये यांनी मानले.सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.विजय अहिरे, कार्यालयीन अध्यक्ष श्री राजेंद्र शिंदे , आय.क्यू. ए.सी. प्रमुख डॉ. चंद्रकांत पाटील प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राणी वाहेगाव येथे हभपअंजलीताई घुंगरड यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**परतूर -जालना (अशोक ठोके) :** ज्या घरामध्ये अतिथीचा योग्य मान राखला जातो आणि जिथे संतांच्या विचारांचा वास असतो, तेच घर खऱ्या अर्थाने धन्य आहे. भौतिक सुखे विकत घेता येतात, मात्र मनाचा परमानंद मिळवण्यासाठी पांडुरंगाच्या नामात दंग होऊन भक्तीच्या सोहळ्यात नाचावे लागते," असे प्रतिपादन ह.भ.प. अंजलीताई घुंगरड (राधामाधव वारकरी शिक्षण संस्था, परतूर) यांनी केले.तालुक्यातील राणी वाहेगाव येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित मंगळवारी रात्री कीर्तन सोहळ्यात त्या बोलत होत्या. जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या 'धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥' या अभंगावर निरूपण




करताना त्यांनी सुख आणि आनंद यातील सूक्ष्म फरक जनसामान्यांच्या भाषेत उलगडून दाखवला.

सुख विकत घेता येते, आनंद नाही,कीर्तनात पुढे बोलताना अंजलीताई म्हणाल्या की, आजच्या आधुनिक युगात घरात टीव्ही, फ्रिज, एसी यांसारख्या भौतिक सुखसोयी आपण पैशाने विकत घेऊ शकतो. मात्र, समाधान आणि आनंद या भिन्न गोष्टी आहेत. पैशाने श्रीमंत असलेल्यांकडे सुख असेलही, पण संतांकडे भौतिक सोयी नसल्या तरी त्यांच्या जीवनात अखंड आनंद असतो. हा आनंद केवळ भक्ती आणि समाधानातूनच प्राप्त होतो.

यावेळी त्यांनी सामाजिक विषयांना हात घालत उपस्थितांचे डोळे उघडले. देशासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या सैनिकांच्या त्यागाची जाणीव त्यांनी करून दिली. तसेच, "ढगाआड गेलेला सूर्य पुन्हा दिसेल, पण एकदा निघून गेलेले आई-वडील पुन्हा दिसणार नाहीत," असे सांगत आई-वडिलांच्या सेवेचे महत्त्व विषद केले. पालकांची सेवा हीच खरी ईश्वरभक्ती असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.भक्ती म्हणजे केवळ देवळात बसणे नव्हे, तर आपले विहित कर्म करताना मुखाने देवाचे नामस्मरण करणे होय. "हाती काम आणि मुखी राम" या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने आपली कर्तव्ये पार पाडावीत. शेवटी केवळ आपली 'कर्मे'च आपल्या सोबत येतात. नातेवाईक आणि समाज केवळ स्मशानभूमीपर्यंत सोबत असतो, पण केलेल्या चांगल्या कर्माची शिदोरीच परलोकी कामाला येते, असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी दिला.या कीर्तन सोहळ्याला राणी वाहेगाव आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हभप अंजलीताई घुंगरड यांच्या ओघवत्या शैलीतील कीर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. राधामाधव वारकरी गुरुकुल मधील विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

# पनवेलच्या रोणाल पाटीलची इंटरनॅशनल स्पर्धेत दुहेरी रौप्य कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** इंडिया ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग कप ही प्रतिष्ठेची आंतरराष्ट्रीय स्पर्धा नुकतीच नवी दिल्ली येथे उत्साहात पार पडली. विविध देशांतील खेळाडूंच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत पनवेल तालुक्यातील केवाळे गावचा उदयोन्मुख खेळाडू रोणाल महेश पाटील याने उल्लेखनीय कामगिरी करत दोन रौप्यपदके पटकावून पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.



३२ किलो वजन गटात भारताचे प्रतिनिधित्व करताना रोणालने महाराष्ट्राचे नेतृत्व केले. अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये त्याने जिद्द, चिकाटी, शिस्तबद्ध सराव आणि खेळाप्रती असलेली निष्ठा यांच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी बजावत दुहेरी रौप्यपदके जिंकली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे पनवेल तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोणालच्या यशाचे मनःपूर्वक कौतुक करत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, "रोणालसारखे खेळाडू पनवेलची क्रीडा परंपरा अधिक समृद्ध करत असून त्यांच्या कर्तृत्वामुळे भविष्यात देशाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक उंचावेल.

रोणालच्या यशामागे त्याचे मुख्य प्रशिक्षक निलेश भोसले, प्रशिक्षक योगेश बईकर तसेच संपूर्ण टीमचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि प्रोत्साहनामुळे रोणालने हे यश संपादन केले.तसेच भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील आणि नगरसेवक अजय बहिरा यांनीही रोणालचे अभिनंदन करून त्याच्या पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. रोणालच्या या यशामुळे पनवेल तालुक्यातील तरुणांमध्ये किकबॉक्सिंगसह इतर क्रीडा प्रकारांविषयी प्रेरणा निर्माण झाली असून भविष्यात तो आणखी मोठी कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# कर्करोग जनजागृती मोहिमेत पेशंटची ऋणभावना

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** कर्करोग रुग्णांना अधिक सुरक्षित, अचूक आणि परिणामकारक कर्करोग उपचार उपलब्ध झाल्याने जागतिक कर्करोग दिनाच्या पार्श्वभूमीवर पेशंटने कर्करोग जनजागृती मोहिमेत ऋणभावना व्यक्त केली .अपोलो रुग्णालयात अचूक कर्करोग उपचार दवाखाना सुरू करण्यात आला असल्याची माहिती कर्करोग उपचार विभागाच्या प्रमुख तज्ज्ञ डॉ. ज्योती बाजपेयी यांनी पत्रकार परिषदेत दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी अरुणेश पुनेथा यांनी सांगितले की, सर्वांसाठी एकसारखी उपचारपद्धती न वापरता प्रत्येक रुग्णासाठी लक्षित आणि वैयक्तिक उपचार



देण्यावर भर दिला जाणार आहे.विविध तज्ज्ञांच्या समितीद्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपचार केले जातील. रुग्णांना अधिक सुरक्षित, अचूक आणि परिणामकारक कर्करोग उपचार उपलब्ध होणार असल्याने कर्करोग रुग्णांना एक चांगली सोय अपोलो मध्ये मिळाली आहे.

# देवरी येथे शालेय विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप संपन्न; शेकडो विद्यार्थ्यांना मिळाली दृष्टीची नवी भेट

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया) :** राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम, जिल्हा परिषद गोंदिया आणि राष्ट्रीय बाल सुरक्षा अभियानांतर्गत आज देवरी येथे एका अत्यंत महत्त्वाच्या आरोग्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देवरी येथील पंचायत समिती सभागृहात तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी 'मोफत नेत्र तपासणी व चष्मे वितरण' शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

या कार्यक्रमाचे मुख्य वितरक म्हणून आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम उपस्थित होते. त्यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये आणि दृष्टीदोषाअभावी त्यांचे शिक्षण थांबू नये, यासाठी शासन आणि प्रशासन कटिबद्ध आहे.या भव्य उपक्रमाचे आयोजन जिल्हा परिषदेच्या माजी सभापती (महिला व बालकल्याण) तथा विद्यमान सदस्य सौ. सविता संजय पुराम यांनी केले होते. त्यांच्या पुढाकारातून राबवण्यात आलेल्या या मोहिमेमुळे तालुक्यातील अनेक दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना याचा थेट लाभ




मिळाला आहे.

**प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन:**

कार्यक्रमाला गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, देवरी पंचायत समितीचे सभापती अनिल बिसेन तसेच देवरी नगरपंचायतचे अध्यक्ष संजू उईके यांची विशेष उपस्थिती लाभली होती. उपस्थित मान्यवरांनी आरोग्य विभागाच्या या मोहिमेचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले.

शिबिराची ठळक वैशिष्ट्ये:

*तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे तपासणी: राष्ट्रीय बाल सुरक्षा अभियानातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडून विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने सखोल तपासणी करण्यात आली.

* मोफत चष्मे वाटप: तपासणी दरम्यान ज्या विद्यार्थ्यांमध्ये दृष्टीदोष आढळला, त्यांना तात्काळ दर्जेदार चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

* सहभाग: देवरी तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने या शिबिरासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग, पंचायत समिती देवरीचे अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले. शालेय स्तरावरच अशा प्रकारच्या तपासणीमुळे मुलांच्या अभ्यासातील अडथळे दूर होण्यास मोठी मदत होणार आहे, अशी भावना यावेळी पालकांनी व्यक्त केली.

# माझी वसुंधरा 5.0 अंतर्गत उमरी नगर परिषद छत्रपती संभाजी नगर विभागात प्रथम क्रमांक घेऊन 75 लक्ष रुपये बक्षीस प्राप्त

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर/ रूपेशकुमार ग.श्रीरामवार** :' माझी वसुंधरा 5.0 अंतर्गत उमरी शहर उच्चतम कामगिरी केल्यामुळे छ.संभाजीनगर विभागात 15 हजार लोकसंख्या गटात पेठ उमरी नगर परिषद प्रथम क्रमांक घेऊन 75 लक्ष रुपये बक्षीस प्राप्त झाले आहे. 21 फेब्रुवारी 2026 रोजी मुंबई येथे त्या निमित्त नगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. हे यश मिळाल्यामुळे आमदार. मा.श्री राजेशजी पवार साहेब यांनी उमरी नगरपरिषद नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले तसेच नगराध्यक्षा सौ.शकुंतला भगवान मुदीराज,उपनगरध्यक्ष श्री.कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष श्री.प्रवीणभाऊ सारडा व




सर्व सन्माननीय नगरसेवक नगरसेविका यांनी अभिनंदन केले आहे.

सदर अभियान तत्कालीन उपविभागीय अधिकारी धर्माबाद श्रीमती.स्वाती दाभाडे मॅडम, मुख्याधिकारी श्रीमती.निलम कांबळे यांच्या परिश्रमाने व मुख्याधिकारी मा.गणेश चाटे यांच्या मार्गदर्शखाली नगर परिषद उमरी जि.नांदेड उच्चतम कामगिरी करुन माझी वसुंधरा अभियान 5.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर मध्ये विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला

तत्कालीन पा.पु.व स्वच्छता अभियंता विशाल अरविंद बाराते ,कार्यालीन अधिक्षक कांचन पडलवार, नगर अभियंता कैलाश येमेलवाड, लेखापाल बालाजी चवरे, संगणक अभियंता विनोद सावंत, पूजा पावडे रचना सहाय्यक, वरिष्ठ लिपिक गणेश मदने, वरिष्ठ लिपिक सचिन गंगासागरे, सत्यनरायण पिंडकुरवार,लिपिक सुर्यकांत माळवतकर, लिपिक गंगाधर पवार, शंकर पाटील, पंडित जाधव,रमाबाई करपे, पंडित जाधव, शंकर माने, मुकादम चंद्रकांत श्रीकांबळे, आकाश खंदारे,पिराजी गायकवाड,नरेंद्र खंदारे,शकील पठाण,अंकुश सवई बालाजी खंदारे, मिलिंद सवई,शहनाज बेग,सुनंदा खंदारे, हमीद बेग,सुरेश मुदिराज,माधव जाधव,सदानंद गायकवाड सर्व घनकचरा कर्मचारी नगर परिषद उमरी यांनी परिश्रम घेतले आहे.

# हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी प्रशासनाचे सूक्ष्म नियोजन ; प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नितीन लोखंडे/तळा :** 'हिंद-दी-चादर' या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी आज दूरदृश्यप्रणालीव्दारे संबंधित यंत्रणांची पूर्वतयारीची सविस्तर बैठक घेऊन आढावा घेतला. कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सर्व विभागांनी समन्वयाने काम करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीदरम्यान कोंकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कोकण विभागातील संबंधित यंत्रणांनी आतापर्यंत केलेल्या कामांचा सविस्तर अहवाल सादर केला.या बैठकीस विभागीय अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, अपर आयुक्त (महसूल) वैशाली इंदानी- उंटवाल, अपर आयुक्त (विकास) माणिक दिवे, अपर आयुक्त (आस्थापना) मिनल कुटे, सहआयुक्त (नगरपालिका प्रशासन) विजयकुमार म्हसाळ, सहआयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, उपायुक्त (नगरपालिका) डॉ. सागर घोलप, सहआयुक्त (विकास) डॉ.प्रदीप घोरपडे, प्रभारी माहिती उपसंचालक मनोज सानप, तहसिलदार गजानन धुमाळ उपस्थित होते.

यावेळी कोंकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कार्यक्रमस्थळी पायाभूत सुविधा, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य सेवा, स्वच्छता व आपत्कालीन यंत्रणा आदी बाबींबाबतची तयारी पूर्णत्वाकडे जात असल्याची माहिती दिली.कार्यक्रमस्थळी येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष मार्गयोजना तयार करण्यात आली आहे. पोलीस विभागाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार असून सीसीटीव्ही यंत्रणा, नियंत्रण कक्ष तसेच स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.



आरोग्य सेवांच्या दृष्टीने ग्रामीण भागात आतापर्यंत २ हजार १५९ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे. कार्यक्रमस्थळी ५ तात्पुरती वैद्यकीय केंद्रे आणि एक आयसीयू उभारण्यात येणार आहे. तसेच जवळील रुग्णालयांमध्ये ३५० खाटा आणि ७५ आयसीयू खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. आरोग्य विभागामार्फत तात्पुरती वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व प्राथमिक उपचार केंद्रांची व्यवस्था केली जाणार असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.या कार्यक्रमासाठी निवडण्यात आलेल्या खारघर, नवी मुंबई येथील ओवे मैदानाची क्षमता एकावेळी सुमारे ५ लाख भाविकांची असून, मुख्य मंडपात ८० हजार भाविक बसू शकतील, अशी व्यवस्था करण्यात येत आहे. लंगर व्यवस्थेसाठी सुमारे अडीच लाख भाविकांचा विचार करण्यात आला असून, १२ हजार ५०० भाविकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील ५ दिवसांत ते पूर्ण होणार आहे.तसेच पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे, वीजपुरवठा आणि प्रकाशयोजना यांसाठी संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. कार्यक्रमादरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कार्यवाही करावी, असे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी अधोरेखित केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रचार व प्रसिध्दी हा महत्वाचा भाग असल्याने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कोकण विभागातील शासकीय व खासगी शाळांमध्ये आतापर्यंत राबविण्यात आलेल्या "हिंद दी चादर" कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी राबविण्यात येत असलेल्या प्रभातफेऱ्या, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता मोहीम अशा विविध कार्यक्रमांचा अहवाल सादर केला. कोकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्हयांच्या ग्रामीण भागातील ५ लाख १७ हजार विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभाग घेतला असून, ४ हजार ३८१ फोटो आणि २ हजार १२५ व्हिडिओ हिंद दी चादर या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या https://gurutegbahadurshahidi.com या पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत. नगरपालिका आणि महापालिका क्षेत्रातील सुमारे १७ लाख विद्यार्थी विविध उपक्रमांमध्ये सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाच्या प्रचारासाठी मुंबई शहर, उपनगर आणि कोकण विभागातील सर्व चित्रपटगृहांमध्ये सुप्रसिध्द गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले विशेष गीत प्रदर्शित करण्यात येत आहे. तसेच मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उल्हासनगर, भिवंडी या नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रात एकूण 219 होर्डिंग्जवर "हिंद दी चादर" कार्यक्रमाची प्रचार प्रसिध्दी करणारे मजकूर लावण्यात आले आहेत. देशभरातून या समागम कार्यक्रमास येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता वाहतूक व्यवस्थेसाठी ३० पार्किंग स्थळांची निश्चिती करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी कोपरा या ठिकाणी तात्पुरता पूल उभारण्यात येत आहे. एसटी, बसेससाठी निश्चित केलेल्या वाहततळापासून मुख्य कार्यक्रमस्थळापर्यंत पायी जाणाऱ्या भाविकांसाठी मुख्य रस्त्याच्या बाजूने तातुरत्या स्वरुपातील पायवाट तयार करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत. जेएनपीए परिसरात दररोज सुमारे २५ हजार जड वाहनांची ये-जा होत असल्याने, वाहतुकीचे नियोजन जिल्हा प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून करण्यात येत आहे. कार्यक्रमस्थळी पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात आली आहे. लंगर व्यवस्थेसाठी १ हजार गॅस सिलेंडर आणि आवश्यक इंधनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ४० ते ५० लाख पाण्याच्या बाटल्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात येत आहे.

या बैठकीस अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, पुणे महसूल आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नाशिक महसूल आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, उपजिल्हाधिकारी (रोहयो) नवी मुंबई समागम समन्वय अधिकारी रविंद्र राठोड, इतर महसूल विभागातील इतर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे कोकण विभागीय अधिकारी, पनवेल व नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त, महसूल, जिल्हा परिषद, शिक्षण, आरोग्य, नगरपालिका, पोलीस विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे हॅप्पी स्कूलच्या संस्थापिका सौ.स्नेहलजी चोरडिया मॅडम यांचा सन्मान



**दैनिक युवक आधार**

**खालापूर/संतोष शेवाळे :** पुणे श्री छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वावोशी विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे हॅप्पी स्कूलच्या संस्थापिका सौ.स्नेहलजी चोरडिया मॅडम यांचा सन्मान पुणे येथे करण्यात आला. सौ स्नेहल चोरडिया मॅडम विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करीत असतात. त्यांच्या संस्थेमार्फत ते शैक्षणिक साहित्य व विद्यालयात भौतिक सुविधा पुरवीत असतात. त्यांच्याबद्दल कृतज्ञता म्हणून विद्यालयातर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी ए एस डी बी दादावाला ज्युनिअर कॉलेजचे प्रा. नितीन गुजराथी सर, सेवानिवृत्त शिक्षिका सौ शारदा चोरडिया मॅडम आणि वावोशी जुनिअर कॉलेज इन्चार्ज प्रा प्रशांत शेळके सर उपस्थित होते.

## कृष्णांगण फाउंडेशन' चा उरण मध्ये सामाजिक उपक्रम; काळाधोंडा शाळेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जबाबदारीचा घेतला वसा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** सामाजिक कार्यासाठी समर्पित असलेल्या कृष्णांगण फाउंडेशन ने आपल्या कार्याचा विस्तार करत उरण मधील काळा धोंडा शाळेच्या विकासासाठी मदतीचा हात पुढे केला आहे .कृष्णांगण फाउंडेशनच्या अध्यक्षा निरजा अनिल कृष्णा यांनी नुकतीच शालेय कमिटी सोबत एक महत्त्वाची बैठक घेतली आणि या बैठकीत शाळा आणि फाउंडेशनने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



कृष्णांगण फाउंडेशनने या शाळेला दरवर्षी आवश्यक शैक्षणिक साहित्य वस्तू आणि मूलभूत सुविधा पुरवण्याच्या आश्वासन दिले आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे त्यांच्या मार्गातील आर्थिक अडथळे दूर व्हावेत या उद्देशाने फाउंडेशनने हे पाऊल उचलले आहे. फाउंडेशनच्या अध्यक्षा निरजा अनिल कृष्णा आणि सचिव श्री शक्ती कुमार भटाईया यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी कार्यरत आहे. या फाउंडेशनची प्रमुख उद्दिष्टे कमी उत्पन्न गटातील पात्र विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक आणि तांत्रिक मदत करणे ,वंचित घटकांसाठी रोजगाराच्या आणि उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, निराधार मुलांसाठी अनाथ आश्रम स्थापन करणे ,या प्रकल्पाचे नियोजन आणि दस्ताऐवजीकरण सध्या प्रगतीपथावर आहे. या भागीदारीमुळे उरण परिसरातील तसेच गरजू विद्यार्थ्यांचे शिक्षणाला एक नवी दिशा मिळणार असून कृष्णांगण फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.कार्यक्रमासाठी राजिप शाळा काळाधोंडा शालेय कमिटी अध्यक्ष शंकर भोईर ,दिलीप पाटील, नवनीत भोईर, राजेश भोईर, तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप पाटील सर आणि सहकारी शिक्षक वृंद अंगणवाडी सेविका राजश्री मॅडम आणि कृष्णांगण फाउंडेशनच्या अध्यक्षा निरजा कृष्णा आणि त्यांच्या मातोश्री या उपस्थित होत्या. यांच्या योगदानामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## श्रमदानातून समाजमंदिराला नवे रूप; एकतेच्या बळावर दांडा भंडारी समाजाचा आदर्श उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन प्रतिनिधी :** श्रीवर्धन येथील दांडा भंडारी समाजाच्या वतीने समाजमंदिर परिसरात श्रमदानाच्या माध्यमातून पाण्याची पाईपलाइन टाकणे व संपूर्ण परिसराची साफसफाई करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. समाजबांधवांनी स्वयंस्फूर्तीने एकत्र येत हे काम पूर्ण केले आणि समाज एकतेचा प्रभावी संदेश दिला.



समाजमंदिरात पाण्याची सोय व्हावी यासाठी नवीन पाईपलाइन टाकण्यात आली. तसेच परिसरातील कचरा व गवत काढून स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमामुळे समाजमंदिर अधिक सुस्थितीत व उपयोगी बनले आहे. विशेष म्हणजे या कामासाठी कोणत्याही बाह्य यंत्रणेकडे न पाहता समाजबांधवांनी स्वतः पुढाकार घेत श्रमदानातून काम पूर्ण केले.

उपक्रमानंतर सर्वांसाठी सामूहिक भोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी "समाज एकता जिंदाबाद" असा नारा देत एकजुटीचे महत्व अधोरेखित करण्यात आले. "आपण एकत्र असलो तर कोणतेही काम अशक्य नाही" असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या स्तुत्य उपक्रमामुळे समाजात एकात्मता वाढण्यास मदत झाली असून, भविष्यातही अशाच प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार समाजबांधवांनी व्यक्त केला.

## गायरान जमिनी नियमित करण्याबाबत निर्णय घ्या – उच्च न्यायालय

**दैनिक युवक आधार**

**रमेश सुरशे/छत्रपती संभाजीनगर :** जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील मौजे पारडगाव येथील अतिक्रमित गायरान जमीन नियमितिकरणाबाबत ४ महिन्यात कायद्यानुसार निर्णय घ्या असे निर्देश छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाने 11 फेब्रुवारी 2026 रोजी जिल्हाधिकारी यांना दिले.



28/11/1991 या शासन निर्णयानुसार दिनांक 17/2/2026 याचिका क्रमांक 6582-डीबी पिटीशन नंबर 1547 ओएफ2026 दाखल केलेले आहे. सुभाष भिवराजी सुतार विरुद्ध शासन व इतर यामध्ये 11 फेब्रुवारी 2026 रोजी छत्रपती संभाजी नगर उच्च न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणाच्या आधारे निर्धारित वेळेत निर्णय घ्यावा अशा आदेश दिले पारडगाव येथील याचिकाकर्ते सुभाष सुतार, रामेश्वर कचरू सुतार,राम सुतार,प्रकाश भिवराजी सुतार ,ताराचंद प्रल्हाद शेंडगे,सिंधुबाई विठ्ठल आठवे,पंडित पांडुरंग सुतार, आदींनी ते कसं असलेली गायरान जमीन 28 नोव्हेंबर 1991 च्या शासन निर्णयानुसार नियमित करावी अशी विनंती करणाऱ्या याचिका अँड.अंगद. एल.कानडे यांच्यामार्फत दाखल केली होती.

## नियमापेक्षा जास्त प्रमाणात रेती वाहतूक करणाऱ्या वाहनावर कार्यवाही करावी,अन्यथा उपोषणाचा इशारा – श्रीनिवास इलतेपवार

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** देगलूर(दि.१९) शासनाने घरकुल धारकांना सहाशे रुपये ब्रार रेती देण्याचे आदेश दिले होते मात्र ते घरकुल धारकांच्या स्वप्नावर पाणी फेरले असून आजघडीला अनेक घरकुल योजनेतील लाभार्थींना रेती ऑनलाईन अर्ज करूनसुद्धा रेती मिळत नसल्यामुळे सात हजार रुपये रेतीला मोजावे लागती आहे,मात्र प्रशासनाकडून या गोष्टीकडे साफ दुर्लक्ष केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे.



मागील काही दिवसापासून कर्नाटकातील रेतीच्या गाडयांना वेग आला असून ही रेती महाराष्ट्रातील जनतेसाठी आहे का कर्नाटकातील जनतेसाठी खुली करण्यात आली आहे हेच कळत नसल्याचे बोलले जात आहे. या गाड्यांना नंबरप्लेट नसून या गाड्या सुसाट वेगाने वाहतूक करीत आहेत व एका रॉयल्टीवर चार ते पाच वेळा रेतीची वाहतूक करीत असून या प्रकाराला आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून मात्र कठोर कारवाई केली जात नसल्यामुळे या अवैद्य रेती वाहतूक करणाऱ्यांचे मनोधर्य वाढत असल्याचे दिसून येत आहे. बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील रेतीचा घाट सुरू करण्यात आला असून, गाडीची क्षमता सतरा टनाची आहे का एकविस टनाची आहे याची मर्यादा न ओळखता एका गाडीत साठ ते सत्तर टन रेतीची वाहतूक होत असल्याची तक्रार दाखल करण्यात आले असून,नियमापेक्षा जास्त प्रमाणात रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी अन्यथा उपोषण करण्यात येईल असे निवेदन श्रीनिवास इलतेपवार यांनी प्रशासनाला दिली आहे.

सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये

डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

### !!जाणता राजा!!

हर हर महादेव
मंत्र गुंजला कडे कपारी
घेऊन शपत रायरेश्वरी
अवतार झाला भगवाधारी.

जनता आनंदली सारी
सोबत मावळे तलवारधारी
आईची शिकवण भारी
स्त्री माता पूजल्या दरबारी.

मोडली सारी वतनदारी
राज्य चालवण्या कारभारी
योजना शेतकऱ्यांच्या कल्याणकारी
जपत शेती भारी.

राज्य आणलं रयतेचं
उभारलं आरमार भारी
किल्ले कडे कपारी
दौडत सैनिक घोड्यावरी.

मोडली पातशाही सारी
राज्याभिषेक करून राजे
देश विदेशात गाजे
दरबार रायगडी सजे.

प्रदीप मनोहर पाटील
गणपूर तालुका चोपडा
जिल्हा. जळगाव
मो. ९९२२२३९०५५

### !!शिवजयंती!!

राजे शिव छत्रपती
वापरली गनिमी युद्धनीती
घेऊन मावळे सोबती
ठेवली सद नीती.

वाचवल्या महिलांच्या इज्जती
पाळून साऱ्या रितिभाती
फिरवली भवानी तलवार
तोफगोळा गनीमा वरती.

वाचवल्या शेतकऱ्यांच्या शेती
जपत सारी नाती
निर्मिले गड किल्ले
मंदिर मस्जिद राजधानीवर्ती.

शूर पराक्रमी राजा
राज्य रयते वरती
मोडत पातशाही देशात
फडकवला ध्वज किल्ल्यांवरती.

राजे अवतरले शिवनेरी
स्थापून स्वराज्य जनतेचं
मृत्यू आला रायगडी
लिखाण औचित्य शिवजयंतीचं .

प्रदीप मनोहर पाटील
गणपूर ता. चोपडा
जिल्हा. जळगाव.

# प्रभाग क्र. १८ मधील वाहतूक, नागरी सुविधा व पाणीपुरवठा प्रश्नांबाबत नगरसेविका सौ. ममता प्रितम म्हात्रे यांची कार्यवाही



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १८ मधील विविध नागरी समस्या व प्रलंबित कामांबाबत नगरसेविका सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा करून मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना लेखी निवेदन देत तातडीच्या कार्यवाहीची मागणी केली आहे.

**"ठाणा नाका सिग्नल वळण रस्ता रुंदीकरणाची मागणी"**

गार्डन हॉटेल सिग्नल परिसर हा वाढत्या शहरी विकासामुळे अत्यंत महत्त्वाचे ठिकाण बनले आहे. हायवेला जोडणारा ठाणा नाका रस्ता अरुंद असल्याने अवजड वाहने तसेच एनएमएमटी बसेसना वळण घेताना अडचणी निर्माण होत असून वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व दुचाकीस्वारांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी सदर ठिकाणी दोन्ही बाजूंनी नियोजनबद्ध पद्धतीने रस्ता रुंदीकरण करून सुरक्षित व सुलभ वाहतुकीची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

"पाडा मोहल्ला व भुसार मोहल्ला येथील प्रलंबित नागरी कामे"

प्रभाग क्र. १८ मधील पाडा मोहल्ला व भुसार मोहल्ला परिसरात नालेसफाई,तुटलेली गटार दुरुस्ती, पेवर ब्लॉक बसवणे, आवश्यक त्या ठिकाणी काँक्रिटीकरण आदी कामे असून नागरिकांकडून त्याबद्दल तक्रार प्राप्त होत आहेत.

याकूब बेग हायस्कूल ते कच्छी मोहल्ला दरम्यान नाला, स्वच्छ करून नव्याने बांधकाम करून आवश्यक त्या ठिकाणी स्लॅब करणे, अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेवर ब्लॉक/काँक्रिटीकरण, सार्वजनिक शौचालयाची ड्रेनेज लाईन दुरुस्ती, तुटलेली गटारे व चेंबर दुरुस्ती, संपूर्ण प्रभागातील नालेसफाई करण्यासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

"महर्षी वाल्मिकी नगर येथे पाहणी दौरा"

महर्षी वाल्मिकी नगर येथे नगरसेविका सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी पाणीपुरवठा संदर्भात पाहणी दौरा केला. यावेळी परिसरातील स्वच्छतेबाबतही आवश्यक सूचना देण्यात आल्या.

या पाहणी दौऱ्याच्या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा व विद्युत विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दौऱ्यादरम्यान नागरिकांकडून ठराविक वेळेत पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची तक्रार करण्यात आली. त्यावर तत्काळ संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या समक्ष पाणी सोडणाऱ्या लाईनमन यांना बोलावून तक्रारीचे निवारण करण्यात आले. यापुढे पाणीपुरवठा सांगितलेल्या वेळेत आणि योग्य दाबाने करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश त्यांच्याकडून देण्यात आले.

प्रभागातील सर्व प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावीत यासाठी सातत्याने प्रशासनाशी समन्वय साधून पाठपुरावा सुरू राहील, असेही नगरसेविका सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी स्पष्ट केले आहे.

> **“मा.प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या सूचनेनुसार संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी दौरा आज मी केला असून अधिकाऱ्यांनी तक्रारी योग्य असल्याचे मान्य करून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रभाग क्र. १८ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेवर आणि दर्जेदार मिळणे ही माझी प्राथमिक जबाबदारी आहे. रस्ता रुंदीकरण असो, नालेसफाई असो किंवा पाणीपुरवठा — प्रत्येक काम तातडीने व पारदर्शक पद्धतीने पूर्ण व्हावे यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. नागरिकांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सोयीसाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.”**
>
> **सौ.ममता प्रितम म्हात्रे**
> **नगरसेविका**

# नैताळे–मानोरी खुर्द येथे आजपासून द्राक्षेमणी लिलाव; शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दरांची संधी

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** विंचूर लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत नैताळे व मानोरी खुर्द येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रांवर आज (दि. १९ फेब्रुवारी) पासून द्राक्षेमणी शेतीमालाच्या लिलावास सुरुवात झाली आहे. सभापती ज्ञानेश्वर (डीके) जगताप यांनी ही माहिती दिली.खानगाव, उगाव, नांदगाव, डोंगरगाव, रूई, धानोरे, कोळगाव, खेडलेझुंगे, धारणगाव वीर, धारणगाव खडक, नांदुरमध्यमेश्वर, गाजरवाडी, नैताळे, सोनेवाडी, श्रीरामनगर, शिवरे, शिवडी, खेडे, वनसगाव, नांदुर्डी, कुंदेवाडी, खडक



माळेगाव, सारोळे खुर्द, रानवड आदी गावांमध्ये द्राक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड आहे. शेतकऱ्यांना मालविक्रीची सोय जवळच उपलब्ध व्हावी, या उद्देशाने दरवर्षी ही केंद्रे सुरू केली जातात.शेतकऱ्यांनी दररोज दुपारी ४ वाजता योग्य प्रतवारी करून द्राक्षेमणी विक्रीसाठी आणावेत. वजनमापानंतर तात्काळ रोख देयकाची व्यवस्था करण्यात आली असून मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित राहणार असल्याने स्पर्धात्मक दर मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकृत खरेदी-विक्री केंद्रावरच माल विक्री करावी, असे आवाहन सभापती ज्ञानेश्वर (डीके) जगताप, उपसभापती संदीप (ललित) दरेकर व सदस्यांनी केले आहे.विनापरवाना शिवार खरेदी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. नवीन व्यापाऱ्यांनी आवश्यक अटी पूर्ण केल्यास तात्काळ परवाना दिला जाईल. इच्छुकांनी लासलगाव मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा, असे सचिव नरेंद्र वाढवणे यांनी कळविले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य रक्तदान व सर्व रोग निदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी ):** - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सार्वजनिक शिव जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य रक्तदान व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये मोठ्या संख्येने युवक-युवतींनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांचे निदान, हाडे, रक्तदाब, शुगर, हिमोग्लोबिन तपासणी आदी सेवा तज्ज्ञ डॉक्टरांकडून देण्यात आल्या. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपतींच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा



आमचा प्रयत्न आहे. रक्तदान हेच जीवनदान असून प्रत्येकाने अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले. सार्वजनिक शिव जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नगरसेवक संतोष जाधव यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व रक्तदाते, नागरिक, डॉक्टर व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वैद्यकीय पथक यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची विवेक भीमनवार यांना पद व गोपनीयतेची शपथ




**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :** लोकभवन येथील कॉन्फरन्स सभागृहात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची विवेक लक्ष्मण भीमनवार यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख उपस्थितीत होते.

याप्रसंगी लोकसेवा आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष रजनीश शेठ, सचिव महेंद्र उत्तमराव हरपाळकर, सदस्य डॉ. अभय वाघ, सदस्य डॉ. दिलीप पाटील - भुजबळ, सदस्य राजीव निवतकर, सदस्य डॉ. सतीश देशपांडे, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी निवड चाचणी स्पर्धा ; स्पर्धेसाठी क्रीडानगरी सज्ज

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्ह्यातील नव्हेच तर राज्यातील प्रतिष्ठेची समजली जाणारी रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी निवड चाचणी स्पर्धा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर दिनांक २० ते २२ फेब्रुवारी पर्यंत संपन्न होणार असून त्यासाठी रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी सज्ज झाली आहे. खेळ आणि कबड्डीच्या विकासासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी तन, मन, धनाने चालना दिली आहे. पनवेलमध्ये



आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय स्पर्धा अनेकवेळा आयोजित करून राज्यात आणि राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक केले आहे. त्याचबरोबर पनवेल आणि रायगडचे नाव उच्च स्तरावर पोहोचविले आहे. या रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी निवड चाचणी स्पर्धेच्या अनुषंगाने सुसज्ज अशी चार क्रीडांगणे तयार करण्यात आली आहेत. त्याचबरोबर मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर पूरक सुविधांचीही तयारी पूर्ण झाली आहे. या क्रीडांगणावर जवळपास ३५०० खेळाडू आपले कसब दाखवणार आहेत. यातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा पुरुष आणि महिला संघ निवड होणार आहे. हि स्पर्धा उत्तम प्रकारे होण्यासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली संयोजन समिती सचिव व राष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर आदी पदाधिकारी विशेषत्वाने लक्ष देत आहेत. त्या अनुषंगाने स्पर्धेसाठी क्रीडानगरी सज्ज झाली आहे.

# श्रीराम मंदिराबरोबरच नांदूर मधमेश्वर गावाच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक विकासासाठी प्रयत्न करणार : भूषण सिंह राजे होळकर

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक/विनोद गायकवाड :** निफाड नांदूर मध्यमेश्वर पुण्यनगरीला पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषण सिंह राजे होळकर यांनी सदिच्छा भेट दिली याप्रसंगी होळकर वाडा संदर्भात संपूर्ण प्रकरण त्यांनी जाणून घेतले त्याचप्रमाणे होळकर वाड्याच्या अव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली मंदिराची होत असलेली वाहतात बघता महाराजांनी यासंदर्भात त्वरित पावले उचलून या मंदिरा संदर्भाचे काम लवकर मार्गी लावण्यासंदर्भात सुतोवाच केले परंतु मंदिर ही गावाची सार्वजनिक संपत्ती असून संपूर्ण गावासाठी मंदिर हे सार्वजनिक रित्या खुले असणे गरजेचे



असून मंदिराची होत असलेली अवस्था व खाजगीकरण या संदर्भात चिंता व्यक्त केली व भविष्यात या संदर्भात गावकऱ्यांशी चर्चा करून व सरकारशी बोलणी करून लवकरात लवकर मार्ग काढण्यासंदर्भात सुतोवाच केले प्रसंगी गावातील अनेक नागरिक तेथे उपस्थित होते उपस्थितांच्या वतीने भूषण सिंह राजे होळकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला तसेच याआधीची होळकर वाड्याची पार्श्वभूमी बघता भूषण सिंहराजे होळकर यांचा हा दौरा अतिशय महत्त्वाचा मोलाचा मानला जात आहे या सदिच्छा भेटीनंतर भूषण सिंह राजे होळकर हे होळकर वाडा संदर्भात कशाप्रकारे प्रयत्न करतात हे बघणे उत्सुकतेचे ठरेल तसेच होळकर वाड्याचा होत असलेला खाजगी करण्याचा प्रयत्न हा यशस्वी होतो की गावकऱ्यांचे मंदिर वाचवण्याचे प्रयत्न यशस्वी होतात हेही येणाऱ्या काळामध्ये बघणे महत्त्वाचे ठरेल मंदिरांचे उद्देश हा गावाची धार्मिक बांधिलकी जपून गावाकडून मंदिरातील देवांची सेवा व्हावी व मंदिरांची देखरेख गावाच्या आखत्यारीत राहून मंदिरांचा सार्वजनिक वापर व्हावा हा मूळ उद्देश गावकऱ्यांचा असून गावकऱ्यांनी त्या संदर्भात प्रयत्न करीत असल्याचे सांगितले व महाराजांनीही सदर मंदिर हे गावाची सार्वजनिक वास्तू असून ते परत एकदा गावाच्या स्वाधीन करण्यासाठी गावास मदत करावी मातोश्री अहिल्यादेवी होळकर यांनी हे आमच्या गावासाठी दिलेले दान असून हे मंदिर परत एकदा आमच्या गावासाठी सार्वजनिक रित्या खुले व्हावे यासाठी भूषण सिंह राजे होळकर यांना साकडे घातले आहे

प्रसंगी होळकरांचे वंशज मुकुंद राजे होळकर अशोक थिटे पाटील , धनगर समाजाचे नेते खंडेराव पाटील, समाधान बागल लक्ष्मण बर्गे दीपक सुडके,तसेच , भाऊसाहेब भवर राजेंद्र बडे भाऊसाहेब पानसरे वाल्मीक बडे बाळू पगारे रामदास काळे भगवान जाधव आदींसह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवछत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव 2026 चे आयोजन महाकालीनगर चौकात



**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** दक्षिण नागपूरतील अमर नगर कडे जाणाऱ्या रोडवरील महाकाली नगर चौकात माँ जिजाऊ डेअरी महाकाली नगर चौकात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सुद्धा माँ जिजाऊ डेअरी तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव गुरुवार ला दुपारी 12 वाजता. साजरा करण्यात येतो. शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे सातवे वर्ष आहे. माँ जिजाऊ डेअरीचे संस्थापक किशोर पवार आणि आयोजक शाहू पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

# भारज बुद्रुक व परिसरातील भाविक भक्तांना शेगाव पायी दिंडी चे लागले वेध

**दैनिक युवक आधार**
**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर कुंनिकाळजे** : जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक व परिसरातील भाविक भक्तांना पायी दिंडीचे वेध लागले असून या पायी दिंडीची जय्यत तयारी भारज बुद्रुक येथील पायी दिंडी सोहळा कमिटीच्या वतीने व स्थानिक नागरिकांच्या वतीने सुरू केली आहे भारज ते शेगाव पायी दिंडी ही भाविकांसाठी एक आनंदाची पर्वणी असते पायी दिंडी मध्ये मार्च महिन्यामध्ये दहा तारखेला भारज येथून प्रस्थान होते या पायी दिंडीमध्ये एकूण चार दिवस प्रवास असतो चार ठिकाणी मुक्काम या पायी दिंडीचा होत असतो मुखामध्ये गजर व गण गण गणात



बोते अशा निनादामध्ये पायी दिंडी महिला व पुरुष यांची मांदियाळी व संपूर्ण रोडने जवळपास एक ते दीड किलोमीटर मध्ये या पायी दिंडीचा विस्तार रस्त्याने चाललेला असतो साहजिकच विदर्भ पंढरी शेगाव येथे जाणारी ही दिंडी दरवर्षी नावलौकिक होऊन येते यंदा दिंडीचे हे आठ वर्ष असून दिंडी सोबत सर्व सोयी सुविधा आरोग्यसह जेवण स्वच्छता सर्व गोष्टीची निगा व शिस्तीची जाण या दिंडीला असते त्यामुळे दिंडीमध्ये सहभागी होण्यासाठी महिला व पुरुषांचे संख्या मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे यामध्ये महिलांना सहभागी पावती ही पंधराशे रुपये असणारा असून यामध्ये दोन साड्या असणार आहे पुरुषासाठी सहभागी पावती ही पाचशे रुपये असणार आहे अनेकांना या पायी दिंडी वारीची ओढ लागली आहे

# प्री-पीएच.डी. कोर्सवर्कचा समारोप सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या सेंटर फॉर हायर लर्निंग अँण्ड रिसर्च, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग व श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्री-पीएच. डी. कोर्सवर्क (दि. ९ ते १६ फेब्रुवारी २०२६) चा समारोप समारंभ उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. देवेंद्र भोंगाडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता तथा श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेजच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर ह्या होत्या. मान्यवर पाहुणे म्हणून ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक




डॉ. विजय खंडाल, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्याम कोरेटी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात अतिथींच्या आगमनाने व विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर कोर्सवर्क समन्वयक डॉ. भारती गोस्वामी यांनी अभ्यासक्रमाचा अहवाल सादर केला. प्री पीचडी कोर्स वर्क मध्ये एकूण ६२ रिसर्च स्कॉलर्स समाविष्ट होते. नयना वोरा, मुकेश मानकर व आश्विन गंगारे या संशोधकांनी आठ दिवसांच्या कार्यशाळेबाबत आपले अनुभव व्यक्त करत अभ्यासक्रम संशोधनाभिमुख व उपयुक्त ठरल्याचे सांगितले.मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संशोधन नीतिमत्ता, आंतरशाखीय अध्ययन व दर्जेदार संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी संशोधकांना समाजोपयोगी व गुणवत्तापूर्ण संशोधन करण्याचे आवाहन केले, तर अध्यक्ष डॉ. मेधा कानेटकर यांनी कोर्सवर्कमुळे संशोधकांचा संशोधन पद्धतीवरील आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगितले.

सदर कोर्सवर्कमध्ये डॉ. मेधा कानेटकर, डॉ. निखिल अटाले, डॉ. आशीष लिंगे, डॉ. मृणमयी कानेटकर, डॉ. शायनी चिब, डॉ. वीणा प्रकाशे, डॉ. मंगला हिरवडे, डॉ. सुमित अरोरा, डॉ. केशव वालके, डॉ. रेखा शर्मा व डॉ. भारती गोस्वामी या तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोपाचे संचालन डॉ. भारती गोस्वामी यांनी केले तर व्यवसाय व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. राहुल खराबे यांनी सर्वांचे आभार मानले.

# नगर परिषद शिवाजी विद्यामंदिरात सांस्कृतिक जल्लोष ; शिवचरित्रावरील नृत्याने प्रेक्षक मंत्रमुग्ध, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले भव्य व्यासपीठ

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम नगर परिषद शिवाजी विद्यामंदिर येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, शिक्षक-विद्यार्थी नाते अधिक दृढ व्हावे तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील शाळेविषयीची भीती दूर व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहाचा नवा उच्चांक गाठला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक नृत्यांनी उपस्थित मान्यवर आणि पालकांची मने जिंकत कार्यक्रम अविस्मरणीय ठरवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन नगर परिषद उपाध्यक्ष मा. श्री. राजूभाऊ भांदुर्गे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण सभापती श्री.




कुणालजी हेडा, मुख्याधिकारी श्री. गायकवाड तसेच इतर मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होतो व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक वेशभूषेत सादर केलेली नृत्ये विशेष आकर्षण ठरली. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित सादर करण्यात आलेल्या नृत्याने उपस्थितांना इतिहासातील शौर्य, त्याग आणि प्रेरणेची जाणीव करून दिली. या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली आणि संपूर्ण परिसर टाळयांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाचे नियोजन श्री. काळबांडे सर यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले. सूत्रसंचालन श्री. बोरकर सर व श्री. नितीन जाधव सर यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन श्रीमती भारतीय मॅडम यांनी केले. विद्यार्थिनींच्या पारंपरिक वेशभूषेची जबाबदारी शाळेतील महिला शिक्षकांनी कुशलतेने सांभाळली.

या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे मुक्तपणे सादरीकरण करण्याची संधी मिळाली असून नगर परिषद शिवाजी विद्यामंदिरच्या उपक्रमशीलतेचे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या कटिबद्धतेचे पुन्हा एकदा प्रभावी दर्शन घडले.

# सिल्लोडमध्ये मोकाट कुत्र्यांचा 'बंदोबस्त'

## नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या पुढाकाराने धडक मोहीम; पालकांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर /सिल्लोड :-** शहरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांनी घातलेल्या हैदोसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना, नगराध्यक्ष अब्दुल समीर अब्दुल सत्तार यांनी या समस्येची गंभीर दखल घेत सोमवारी शहरात विशेष मोहीम राबवली. पालिकेच्या या 'ॲक्शन मोड'मुळे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त झाला असून, पालकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.शहरातील मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांत कुत्र्यांच्या झुंडीमुळे पादचाऱ्यांवर हल्ले होण्याच्या घटना वाढल्या होत्या. चिमुकल्यांना शाळेत पाठवताना पालकांच्या मनात धडकी भरत होती. ही बाब लक्षात घेऊन नगराध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने तातडीने नियोजन केले. मुख्यअधिकारी कारभारी दिवेकर, उपमुख्यअधिकारी अजगर पठाण व स्वच्छता निरीक्षक सय्यद शहेबाज अली



यांनी मोहिमेची धुरा सांभाळली.

केवळ आदेश देऊन न थांबता, लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष मैदानावर उतरून या मोहिमेची पाहणी केली. उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, आरोग्य सभापती अकील वसईकर, नगरसेवक आसिफ बागवान व रईस मुजावर यांच्या उपस्थितीत प्र. स्वच्छता निरीक्षक अनवर पठाण यांच्या पथकाने शहराच्या विविध भागांतून कुत्र्यांना जेरबंद करण्याची कारवाई केली. पालिकेच्या या तत्परतेचे सिल्लोडकरांनी स्वागत केले असून, अशाच प्रकारची सातत्यपूर्ण मोहीम राबवण्याची मागणीही होत आहे.

**विद्यार्थ्यांची सुरक्षा हीच प्राथमिकता**

**"मोकाट कुत्र्यांचा त्रास वाढल्याच्या तक्रारी प्राप्त होताच आम्ही प्राधान्याने ही मोहीम हाती घेतली. विद्यार्थ्यांच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. शहरवासीयांना भयमुक्त वातावरण देण्यास पालिका कटिबद्ध आहे."**

**— अब्दुल समीर अब्दुल सत्तार (नगराध्यक्ष, सिल्लोड)**


# तपोवनातील १८२५ वृक्षांच्या कत्तलीस 'अभिनव प्रतिष्ठान'चे 'एनजीटी'त आव्हान!

## साधुग्रामसाठी निसर्गविनाशाचा घाट; ६० प्रमुख महंतांचाही प्रशासनाला कडाडून विरोध

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड** : नाशिक येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या नियोजनावरून आता प्रशासकीय निर्णयांविरुद्ध संघर्षाची ठिणगी पडली आहे. 'साधुग्राम' उभारण्याच्या नावाखाली तपोवन परिसरातील १८२५ पुरातन व देशी वृक्षांची कत्तल करण्याचा घाट प्रशासनाने घातला असून, या निर्णयाला सिल्लोड येथील 'अभिनव प्रतिष्ठान'ने थेट राष्ट्रीय हरित लवादाचे (NGT) दरवाजे ठोठावून आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे, ज्या साधू-संतांच्या निवासासाठी ही वृक्षतोड प्रस्तावित आहे, त्या ६० हून अधिक प्रमुख महंतांनीच "आम्हाला वृक्ष तोडून निवास नको" अशी ठाम भूमिका घेत 'हरित कुंभ' संकल्पनेला जाहीर पाठिंबा दिला आहे.

कुंभमेळयासाठी ३०० एकर जागेवर








**"तपोवन हे ऐतिहासिक दंडकारण्य आहे. येथे वृक्षतोड करणे म्हणजे पर्यावरणाशी प्रतारणा आहे. सरकारने व साधू-महंतांनी मिळून 'हरित कुंभ' ही संकल्पना राबवावी, यासाठी आमचा कायदेशीर लढा सुरूच राहील."**

**— डॉ. संतोष पाटील (उपाध्यक्ष, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड)**

तात्पुरते साधुग्राम उभारण्यासाठी राज्य सरकारने २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र, या प्रक्रियेत होणाऱ्या मोठ्या वृक्षतोडीमुळे हे ऐतिहासिक क्षेत्र भविष्यात 'बिल्डर लॉबी'च्या घशात जाण्याची भीती पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. प्रभू श्रीरामांच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे 'दंडकारण्य' सिमेंटचे जंगल होणार का? असा संतप्त सवाल **'अभिनव प्रतिष्ठान'**ने उपस्थित केला आहे.

या संदर्भात प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांनी इंदूर, उज्जैन आणि महाराष्ट्रातील प्रमुख आखाड्यांच्या साधूंशी प्रत्यक्ष संवाद साधला. यामध्ये इंदूरचे विजय पुरी महाराज, महंत केशवनाथ नागा बाबा, उज्जैनचे बलकदास महाराज, बलीरामदास नागा बाबा आणि मुर्डेश्वरचे मठाधिपती ओंकार गिरी महाराज यांच्यासह ६० महंतांनी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांना लेखी पत्र देऊन आपला तीव्र निषेध नोंदवला आहे. उच्च न्यायालयाने यापूर्वीच या वृक्षतोडीला स्थगिती दिली असून, आता २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या हरित लवादाच्या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# मुदगल ते कुंभारी रस्त्यांवरील कठडे नसल्याने पुल बनला धोकादायक

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ तालुक्यातील मुदगल ते कुंभारी रस्त्यांवरील मुदगल बस स्टॉप जवळील पुलावर कठडे नसल्याने हा पुल वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे या पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते या मुदगल ते कुंभारी रस्त्यांवर नेहमीच वाहनांची वर्दळ असलेल्या या पुलावरून विद्यार्थ्यांसह वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने मोठी दुर्घटना



घडण्यापूर्वी प्रशासनाने याकडे लक्ष देत तातडीने या मुदगल ते कुंभारी रस्त्यांवरील मुदगल बस स्टॉप जवळील पुलास कठडे बसविण्याची मागणी या परिसरातील नागरिकांतून होत आहे या पुलास दोन्ही बाजूची कठडे नसल्याने या पुलावरून होणारी वाहतूक अत्यंत धोकादायक बनली आहे विशेषतः ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर बैलगाड्या दुचाकी वाहने तसेच शाळकरी विद्यार्थी या पुलावरून नियमित ये जा करीत असल्याने अपघाताची शक्यता वाढत आहे या पुलास कोणतेही सुरक्षा कवच नसल्याने वाहन किंवा गुरेढोरे या पुलावरून कोसळून मोठी जीवितहानी होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे या पुलावरून वाहतूक करताना नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे हा मुदगल ते कुंभारी रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत असून दोष दायित्व कालावधी ( D L P ) अंतर्गत ५ वर्षांकरिता देखील दुरुस्ती आहे देखभाल दुरुस्ती प्रारंभ दिनांक २३/२/२०२२ देखभाल दुरुस्ती समाप्त दिनांक २८/१२/२०२८ आहे परंतु अजूनही या मुदगल ते कुंभारी रस्त्यांवरील मुदगल बस स्टॉप जवळील पुलावर कठडे बसविण्यात आले नाहीत या दरम्यान पुलाच्या दुरुस्ती बाबत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत विभागाने तात्काळ लक्ष देवून पुलास कठडे बसवून सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांतून होत आहे तरी याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देत तातडीने दुरुस्ती करून जिवित हानी टाळावी

# जाणता राजा

जाणता राजा, रयतेचा राजा म्हणून जगभरात दरारा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्वभावातील सहिष्णुता, दूरदृष्टी, करारीपणा व धाडसी वृत्ती अशी अनेकविध गोष्टी आजही समाजाला प्रेरणा देतात. शिवाजी महाराजांपासून प्रेरणा घेत लोकमान्य टिळक स्वातंत्र्य संग्रामात सहाभागी झाले होते आणि त्यांनी शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा करण्याची प्रथा सुरु केली. छत्रपती शिवाजी महाराज हे असे महापुरुष होऊन गेले की, त्यांचे कार्य, पराक्रम आणि विचार यांची प्रेरणा अजूनही ताजी आहे. आजही आपण त्यांच्या काळासंदर्भात त्यांच्या स्वराज्य निर्मितीचा विचार करायला लागतो तेव्हा त्यांनी किती प्रतिकूल स्थितीत हे सतीचे वाण आपल्या हाती घेतले होते याचा अचंबा वाटतो. शिवाजी महाराज ज्या प्रदेशात रहात होते तो प्रदेश आदिलशहाच्या अधिपत्याखाली होता. तेव्हा त्यांच्या विरोधात बंड करणे म्हणजे प्राणाशी गाठच असायची. डोळे फोडणे, मालमत्तेची राखरांगोळी करुन जबर दंड बसवणे, कुटुंबांसह जाळून हत्या करणे, तोफेच्या तोंडी देणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायाखाली चिरडून मारणे किंवा घोड्यांच्या पायांना बांधून फरपटत नेणे अशा अमानुष शिक्षा दिल्या जात असत. अशा शिक्षा भोगण्यापेक्षा त्यांच्या पायाशी शरण जाणे परवडेल अशी मानसिकता समाजात होती. पण शिवाजी महाराजांनी अशाही परिस्थितीत परकीयांची राजवट उलथून टाकून स्वत:चे राज्य निर्माण करण्याचा पण केला. हे त्यांचे महान कार्य आजही आपल्याला प्रेरणा देत असते.शिवाजी महाराजांनी एकदा साहस करण्याचा निर्धार केल्यावर कितीही संकटे आली तरीही आपल्या ध्येयापासून विचलित न होण्याचा त्यांचा गुणही असामान्यच होता. राजे निश्चयापासून ढळले असते तर सारे सहकारीही बिथरले असते. म्हणून खंबीरपणे उभे राहून महाराजांनी केवळ अडचणींना तोंडच दिले असे नाही तर त्या अडचणींतून मोठ्या कुशलतेने मार्गही काढले. महाराजांनी आपल्या सवंगड्यात स्वराज्य स्थापनेचा ध्येयवाद इतका पक्का रुजवला होता की, त्या ध्येयवादाच्या मार्गातून त्यांचे सहकारी कधीही ढळले नाहीत. शिवाजी महाराजांचे काही आप्त त्यांच्या विरोधात होते. पण तरीसुद्धा ते डगमगले नाही. स्वराज्यापायी आपल्या संसाराची वाताहत कशाला करुन घ्यायची? असा विपरीत विचार शिवाजी महाराजांनी केला नाही. शिवाजी महाराजांचे आयुष्य संघर्षमय होते. तरी त्यावर पाय रोवून उभे राहत महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली.शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे होते. शिवाजी महाराज घोड्यांचा वापर निर्णायक प्रसंगी करत असत. शिवाजी महाराजांनी अनेक मोहिमांमध्ये घोड्यांचा वापर नेमकेपणाने केला. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास, तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे सात घोडे होते. कृष्णा या पांढऱ्या घोड्यावर शिवाजी महाराज राज्यभिषेकानंतर बसले होते.